सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती

टोपे नगर,मालटेकडी रोड,अमरावती – 444602
**Mail -** raaamravati@maa.ac.in dietamravati@gmail.com **website-** https://www.dietamravati.com

जा.क्र. जिशिप्रसंअम/ आनापान प्रशिक्षण /अम./2026 / 501 दिनांक: 29 /7/2026

**महत्वाचे/कालमर्यादित**
**प्रति,**

**शिक्षणाधिकारी, म.न.पा, अमरावती**
**गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,सर्व**
**प्रशासन अधिकारी, नगरपरिषद सर्व**

**विषय:- राज्यातील सर्व प्राथमिक इयत्ता ५ वी ते १०/१२ वी च्या वर्गाकरीता मित्र उपक्रमांतर्गत साधना वर्ग राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुखांचे मित्र उपक्रमांतर्गत 'आनापान साधना प्रशिक्षण' आयोजित करणे बाबत.**

**संदर्भ:-** १) शासन परिपत्रक क्र. संक्रीर्ण २०११/(२९६/११) माशि-३ दिनांक ०५ ऑक्टोबर २०११
२) शासन परिपत्रक क्र. संक्रीर्ण २०११/(२९६/११) माशि-३ दिनांक २७ जानेवारी २०१२
३) शिक्षण संचालनालय माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग यांचे पत्र क्र. ६६०१ दिनांक ११ जुलै २०१२
४) राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्र २२२५ दिनांक १२ जून २०१४
५) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे यांचे पत्र क्र. ३६०५दिनांक ०५ ऑक्टोबर २०१७.
६) दिनांक २६ जुलै २०१९ रोजी संपन्न झालेल्या कार्यशाळेचे इतिवृत्त
७) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे यांचे पत्र जा. क्र. शिक्षण आयुक्ता / विप, स/२०२०-२१/४३, दि ०८ डिसेंबर, २०२०
८) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट) यांचे पत्र दि. ४/०२/२०२६
९) कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.७८/एस. डी. ४ दि.०८ मे, २०२६
१०) प्रस्तुत कार्यालय पत्र SCERT-४६.०/२३/२०२६-ART & SPORTS I/१८९२८९८/२०२६ दि. १२.०५.२०२६
११) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट) यांचे पत्र दि. १८/०५/२०२६.
१२) जा.क्र. राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण / सन २०२६-२७/दिनांक २९ मे २०२६.
१३) धम्म अमरावती विपश्यना केंद्र लुंबिनी मोगरा भानखेड यांचे पत्र दिनांक – ०२.०७.२०२६

उपरोक्त संदर्भीय परिपत्रानुसार शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना राज्यस्तरावरून प्राप्त झालेल्या आहेत. केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षणाधिकारी ह्यांनी मित्र उपक्रमांतर्गत शिक्षकांना आनापान साधनांचे प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. त्यांनतर ते शिक्षक आपापल्या शाळात मित्र उपक्रम अंमलबजावणी करु शकतील.

मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिक्षण परिषदेच्या पूर्वी मित्र प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. अमरावती जिल्ह्यात 'धम्म अमरावती' विपश्यना केंद्रातर्फे मित्र उपक्रम टीमकडून केंद्र प्रमुख तसेच इतर वरिष्ठ शिक्षण अधिका-यांना प्रशिक्षण दिले जाईल.

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती मुख्य सभागृह येथे दिनांक 31 जुलै 2026 रोजी सकाळी 9 ते 1 व दुपारी 2 ते 6 या वेळेत खालील नियोजना प्रमाणे संबंधित सर्व केंद्राच्या केंद्रप्रमुख यांनी हे 3 तासाचे प्रशिक्षण पूर्ण करावे.**

इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीकरिता हा उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याने सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे पूर्वी पर्यवेक्षकीय यंत्रणा,केंद्रप्रमुख विषय साधन व्यक्ती सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांचे आनापान साधनेचे प्रशिक्षण पूर्ण होणे गरजेचे आहे.

तरी खालील नियोजना नुसार आपल्या कार्यक्षत्रातील सर्व केंद्रप्रमुखांना (नगर परिषद सह) उपस्थित राहण्यासाठी सूचित करावे.

| अ.क्र. | संबंधित तालुके/URC | सहभागी होण्याची वेळ | प्रशिक्षण स्थळ |
|---|---|---|---|
| 1 | अमरावती(ग्रामीण),अमरावती म.न.पा.,भातकुली,चांदूर बाजार,चांदूर रेल्वे,दर्यापूर मोर्शी, तिवसा | सकाळी 9 ते 1 | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अमरावती मुख्य सभागृह |
| 2 | अचलपूर,अंजनगाव सुर्जी चिखलदरा धामणगाव रेल्वे धारणी वरुड नांदगाव खंडे. | दुपारी 2 ते 6 | |

(मिलिंद कुबडे)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
अमरावती

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर**

- मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अमरावती.

**प्रत – माहिती व कार्यवाहीस्तव**

- शिक्षणाधिकारी(प्राथमिक व माध्यमिक),जिल्हा परिषद, अमरावती.
- संबंधित सर्व समूह साधन केंद्र समन्वयक यांनी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे.

आई डॉ. कमल ताई गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती
रजि नं. E 611

## 'धम्म अमरावती' विपश्यना केंद्र,

लुंबिनी (मोगरा), पोस्ट भानखेड ता. जि. अमरावती


डॉ. कमलताई गवई
व. आचार्या तथा केंद्र आचार्या
धम्म अमरावती विपश्यना केंद्र
अमरावती
सपर्क 9823102183

श्री. रजत भटकर
निबंधक
धम्म अमरावती विपश्यना केंद्र
अमरावती
संपर्क 8446106785

mail:- dhammaamravati2020@gmail.com / Website:- www.amravati.dhamma.org


जा. क्रं:-

दिनांक 02/07/2026

प्रति,
माननीय प्राचार्य **(DIET)**,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती

विषयः जुलै २०२६ च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत.

संदर्भ:
१) जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/दिनांक २९ मे २०२६.
२) जा.क्र. आशिका/स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दिनांक ८ ऑगस्ट २०१९

मा. महोदय,
कृपया वरील संदर्भीय परिपत्रानुसार जुलै २०२६ महिन्यातील केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी ह्यांनी मित्र उपक्रमांतर्गत शिक्षकांना आनापान साधनांचे प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. त्यांनतर ते शिक्षक आपापल्या शाळात मित्र उपक्रम अंमलबजावणी करू शकतील.

मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिक्षण परिषदेच्या पूर्वी मित्र प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे. अमरावती जिल्ह्यात 'धम्म अमरावती' विपश्यना केंद्रातर्फे मित्र उपक्रम टीमकडून केंद्र प्रमुख तसेच इतर वरिष्ठ शिक्षण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

आपल्या सोयीनुसार अमरावती जिल्यात योग्य ठिकाणी सर्व केंद्रप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी दोन किंवा तीन कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात आणि त्यात सहभागी होण्याचे आदेश निर्गमित करावे ही विनंती. त्यासाठी लागणारी सर्व व्यवस्था ही केली जावी. प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी धम्म अमरावती विपश्यना केंद्रातर्फे आम्ही पूर्ण सहकार्य करू.

आपले नम्र

| केंद्र आचार्या | निबंधक | समन्वयक<br>मित्र उपक्रम<br>अनिल हिरेखन<br>(8788857806) | समन्वयक<br>मित्र उपक्रम<br>राहुल तंतरपाळे<br>(9096277299) |
|---|---|---|---|

विपश्यना केंद्र, लुंबिनी (मोगरा) ... रजि. नं. ई-६११

मंगल हो !


OnePlus 11R 5G
Abhay Tours& Travels
MASTER SERIES